भोसरी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड आयुक्तालय
पत्ता:- पुणे नाशिक हायवे, सी. आय. आर. टी. जवळ,
एम.आय.डी.सी. भोसरी, पुणे.२६ फोन नं. ०२०- २७१२४७२८
ई-मेल आयडी psbhosari.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट दिनांक.२८/१२/२०२२

## भोसरी पोलीस स्टेशन तपास पथकाची दबंग कामगिरी

## भोसरी, महाळुंगे, चिखली,एम.आय.डी.सी.भोसरी, दिघी परिसरात मोटार सायकली चोऱ्या करणाऱ्या सराईत चोरटयास अटक करून त्याचेकडून सहा लाख रूपये किंमतीच्या तब्बल १३ मोटर सायकली हस्तगत

भोसरी पोलीस स्टेशन हददीत वारंवार होत असलेल्या मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांचे बाबत वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर जाधव यांनी भोसरी पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी पोलीस सपोनि श्री कल्याण घाडगे व पोलीस उप-निरीक्षक श्री मुकेश मोहारे यांचे नेतृत्वाखाली तपास पथकाची दोन टीम तयार करून मोटार सायकल चोरी करणाऱ्यां सराईत गुन्हेगारांचा शोध सुरु केला असता पोलीस उप निरीक्षक मुकेश मोहारे यांचे नेतृत्वाखालील टीम तपास करीत असताना टिम मधिल अंमलदार पोलीस अंमलदार सागर जाधव व आशिष गोपी यांना त्यांचे बातमीदारा मार्फत मिळालेल्या बातमीवरून भोसरी पोलीस ठाणे परिसरात मोटर सायकली चोरी करणारा इसम वाहन विक्री करण्याकरीता भोसरी स्मशानभुमीजळव येत असल्याची माहिती मिळाली त्या अनुशंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर जाधव यांचे दिमतीत तपास पथक अधिकारी श्री. कल्याण घाडगे व मुकेश मोहारे यांनी लागलीच तपास पथकातील दोन्ही टिम मिळाल्या बातमीचे ठिकाणी घेवुन जावुन सापळा लावून आरोपी नामे रामेश्वर नवनाथ अडकिने यास ताब्यात घेतले व त्याचेकडे कसोशीने चौकशी करुन तपास केला. त्याने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हददीत भोसरी, भोसरी एम.आय.डी.सी., दिघी, चिखली, महाळुंगे, चाकण पोलीस स्टेशन हददीत व पिंपरी चिंचवड परिसरातील मोटार सायकली चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे त्यास भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्रमांक ९३७/२०२२ भादवी कलम ३७९ या गुन्हयात अटक करुन अधिक तपास केला असता त्याने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हददीत व भोसरी परिसरात वेगवेगळया ठिकाणी मोटार सायकली चोऱ्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोपी नामे रामेश्वर नवनाथ अडकिने हा भोसरी, दिघी, एम.आय.डी.सी.भोसरी, चिखली, महाळुंगे चाकण या परिसरात त्याचे साथीदार नामे परशुराम कांबळे रा. भोसरी पुणे याचेसोबत मिळून चोरी करणारा अटल मोटर सायकल चोरटा आहे. त्याने आत्ता पर्यत मोटार सायकली चोरीचे एकुण ०८ गुन्हे केले आहेत. नमुद आरोपी कडुन गुन्हयातील चोरी केलेल्या एकूण १३ मोटार सायकली असा एकुण ६,००,०००/- रुपये किं.चा मुददेमाल हस्तगत करणेत आलेला असुन खालील प्रमाणे ०८ गुन्हे उघडकिस आणलेले आहेत.

१) भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ३३७/२०२२ भादवि कलम,३७९
२) भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ७८/२०२२ भादवि कलम ३७९
३) भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ९७२/२०२२ भादवि कलम ३७९
४) भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं. १०३१/२०२२ भादवि कलम ३७९
५) चिखली पोलीस स्टेशन गु.र.नं. ४४९/२०२२ भादवि कलम ३७९
६) दिघी पोलीस स्टेशन गु.र.नं. ४६१/२०२२ भादवि कलम ३७९
७) चाकण पोलीस स्टेशन गु.र.नं. १५४४/२०२२ भादवि कलम ३७९
८) भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशन गु.र.नं. ६०९/२०२२ भादवि कलम ३७९

Scanned with CamScanner

सदर कामगिरी मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. मनोज लोहिया सो, सह. पोलीस आयुक्त, मा. श्री संजय शिंदे सो अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. विवेक पाटील, पोलीस उपायुक्त परि. १, मा. श्रीमती प्ररणा कट्टे सो. सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, श्री. भास्कर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अरविंद पवार पोलीस निरीक्षक(गुन्हे) यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. कल्याण घाडगे, पोउपनि श्री. मुकेश मोहारे, सहा.फौजदार राकेश बोयणे, पोलीस अंमलदार हेमंत खरात, अजय डगळे, रविंद्र जाधव, नवनाथ पोटे, धोंडीराम केंद्रे, प्रभाकर खाडे, सागर जाधव, आशिष गोपी, संतोष महाडीक, सचिन सातपुते, तुषार वराडे, स्वामी नरवडे, भाग्यश्री जमदाडे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

(विवेक पाटील)
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ ०१, पिंपरी चिंचवड.

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner